ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांना निवृत्तीनंतर येणाऱ्या कौटुंबिक समायोजनच्या समस्या

लक्ष्मी सीताराम डाखोळे

**प्रस्तावना -**

भारतातील कुटुंब संस्था ही संयुक्त पद्धतीची असल्यामुळे वृद्धांची समस्या निर्माण झाली नव्हती. संयुक्त कुटुंब पद्धतीत वृद्धांना आदराचे स्थान असते. तसेच वृद्ध माता-पित्याचा सांभाळ करणे हे मुलाचे आवश्यक कर्तव्य मानले जाते. परंतु औद्योगिकरण, नागरीकरण आणि आधुनिकी करणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. नागरी समाजात प्रामुख्याने विभक्त कुटुंब पद्धती आढळुन येते.

संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आल्या बरोबर वृद्धांची समस्या निर्माण झालेली आढळते. औद्योगिकीकरण, नागरीकरण, आधुनिकीकरण या सर्व घटकांचा प्रभाव कुटुंब आणि विवाह संस्थांवर पडलेला आढळतो. त्या प्रभावामुळे देशातील कुटुंब आणि विवाह संस्थेत परिवर्तन होत आहेत. विभक्त कुटुंबात वृद्ध आई वडिलांना समजुन घेतले जात नाही. म्हणून वृद्धांची समस्या निर्माण झाली आहे.

जगामध्ये एक दशलक्ष लोक प्रत्येक महिन्याला वयाची साठी ओलांडतात. त्यापैकी जवळपास 80ः लोक हे विकसनशील राष्ट्रातील असतात. भारततही ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. भारत हा तरुणांचा देश म्हणुन ओळखला जाते. देशात 20 वर्षापेक्षा कमी वयाची जवळपास 50ः लोकसंख्या आहे, मात्र यापुढे ज्येष्ठांची संख्या वाढलेली असेल. कारण मृत्युदर व जन्मदर यामध्ये मोठ्या प्रमाणात घट होत असल्यामुळे जन्मानंतर पुढे ही अपेक्षित आयुर्मान वाढलेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा लोकांचे आयुर्मान 32 वर्षे होते. आज ते 60 वर्षापर्यत पोहचले आहे. त्यामुळे एकुण लोकसंख्येच्या तुलनेत ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. ते पुढील तालिकेवरून स्पष्ट होते.

**भारतातील वृद्धांची लोकसंख्या (मे 2006)**

अंक दशलक्षामध्ये असून कंसातील अंक एकुण लोकसंख्येतील शेकडा प्रमाण दर्शवितात.

| वर्ष | पुरुष | स्त्री | व्यक्ती |
|---|---|---|---|
| 2006 | 40.75(7.10) | 42.83(8.00) | 83.58(7.50) |
| 2011 | 48.14(7.70) | 50.33(8.70) | 98.47(8.30) |
| 2016 | 58.11(8.70) | 59.99(9.80) | 118.10(9.30) |
| 2021 | 70.60(10.20) | 72.65(11.30) | 143.24(10.70) |
| 2016 | 84.62(11.80) | 88.56(13.10) | 173.18(12.40) |

*स्त्रोत :- सामान्य सचिवालय भारत सरकार*

या तालिकेनुसार भारतात एकुण लोकसंख्येच्या 7.50 टक्के व्यक्ती 60 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या होत्या त्यात पुरुष व स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे 7.10 व 8.0 टक्के इतके होते. 2016 पर्यत हे ज्येष्ठाचे प्रमाण 9.90 टक्के तर 2026 पर्यत 12.40 टक्के झालेले असेल. वृद्ध स्त्रियांची संख्या ही वृद्ध पुरूषांच्या तुलनेत जास्त असलेली आढळुन येते. त्यामुळे स्त्रियांना वृद्ध पुरूषांच्या तुलनेत अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

वृद्धावस्था ही आयुष्याची संध्याकाळ असते. त्यामुळे वृद्ध व्यक्तींची योग्य काळजी घेणे, सेवा सुश्रुषा करणे, मानसिक आणि कौटुंबिक शांतता लाभणे इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. परंतु या गोष्टींची काळजी घेतली जात नाही. उलट वृद्धांकडे दुर्लक्ष केल्या जाते.

स्त्रियांना नोकरी व कुटुंब असे दोन्ही तारे वरची कसरत करून सांभाळावे लागते. सेवेमध्ये असतांना सेवेतील जबाबदारी व कुटुंबातील जबाबदारी स्त्री ही अगदी योग्य प्रकारे पार पाडते. परंतु सेवा निवृत्तीनंतर सेवेमध्ये असतांनाचे कौटुंबिक कामे व निवृत्ती नंतरच्या कौटुंबिक कामांमध्ये फरक पडतो. निवृत्ती नंतर वृद्ध स्त्रियांना कौटुंबिक समायोजनाला सामोर जावे लागते. निवृत्ती नंतर कुटुंबामध्ये समायोजनाशी संबंधीत समस्या निर्माण होतात.

जेष्ठ्य लोकांना (Elderly People), वृद्ध (Old) सेवानिवृत्त (Retired) ज्येष्ठ नागरिक (Senior Citizen) म्हणुन संबोधितात. ग्रामीण क्षेत्रात म्हातारे (Old People) असे म्हणतात. नोकरीत विशिष्ठ वयोमर्यादे पर्यंत सेवा केल्यानंतर निवृत्त झालेल्या व्यक्तींना सेवा निवृत्त म्हणतात.

**अध्ययनाचे उद्देश :-**

1) सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांची वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
2) उत्तर दात्यांना सेवा निवृत्ती नंतर येणाऱ्या कौटुंबिक समस्यांचे अध्ययन करणे
3) सेवा निवृत्त वृद्ध स्त्रियांचे निवृत्ती नंतरचे कौटुंबिक संबंधातील बदल जाणून घेणे.

**क्षेत्र:-**

नागपूर शहरातील दक्षिण नागपूर येथील सदगुरू नगर व पश्चिम नागपूर येथील सुरेंन्द्र नगर, खामला हया क्षेत्राची अध्ययनासाठी निवड करण्यात आली.

**नमुना निवड व तथ्य संकलन :-**

प्रस्तुत अध्ययनासाठी 30 सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांची निवड करण्यात आली.

तथ्य संकलनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड मधील सोयीस्कर नमुना निवडीचा वापर करण्यात आला. तथ्य संकलनासाठी सहभागी निरीक्षण व मुलाखत ही पद्धत वापरण्यात आली. या निरीक्षणा दरम्यान व चर्चे दरम्यान मिळालेली माहिती पुढील प्रमाणे

सेवानिवृत्त वृद्ध स्त्रिया हया एकत्र कुटुंबामध्ये राहणाऱ्या आहे. सेवानिवृत्तीमुळे कुटुंबियांच्या वागणुकीमध्ये बदल झाली. सेवानिवृत्तीमुळे कुटुंबियांची कौटुंबिक कामामध्ये अपेक्षा वाढल्या. सेवानिवृत्ती पूर्वी कुटुंबियांकडून कामाची अपेक्षा नव्हती परंतु सेवानिवृत्ती नंतर घरगुती कामाची अपेक्षा वाढली. सेवानिवृत्तीनंतर सूनेशी व मुलाशी सुसंवाद कमी झाला. सेवानिवृत्तीपूर्वी मिळणारे वेतन हे निवृत्ती वेतनापेक्षा जास्त होते. त्यामुळे कुटुंबातील सर्व गरजा पूर्ण होत होत्या. सेवानिवृत्ती नंतर मिळणाऱ्या निवृत्ती वेतनामध्ये गरजा पूर्ण होत नाही. खर्च जास्त वाढला. खर्च वाढल्यामुळे लागणाऱ्या वस्तुंमध्ये कपात केली. काटकसर वाढली. सेवानिवृत्ती नंतर घरातील कामांमध्ये वाढ झाली. सेवानिवृत्तीनंतर एका वेळेचा स्वयंपाक करावा अशी अपेक्षा असते. सेवानिवृत्तीपूर्वी घरगुती कामांची अपेक्षा नव्हती.

सेवानिवृत्ती नंतर पतीसोबत सुसंवाद वाढला सेवानिवृत्ती पूर्वी पुरेसवेळा देवू शकत नव्हती परंतु आता पूर्ण वेळ घालविता येतो. त्याच्या मताप्रमाणे त्यांच्या सोबत बाहेर जाता येते. सेवानिवृत्तीनंतर नातवंडांना सांभाळणे वाढले. नातवंडांची तयारी करून देणे, त्यांना बाहेर फिरायला घेवून जाणे, शाळेत सोडायला जाणे, त्यांचा अभ्यास घेणे, नातवंडांना सेवानिवृत्ती नंतर जास्त वेळा द्यावा लागतो. घरामध्ये काम केले तर सर्व खुश असतात सेवानिवृत्ती नंतर ही मुलाची सुनेची घरामध्ये पैसे द्यावे ही अपेक्षा असते. सेवानिवृत्ती नंतर सुनेशी संबंध एकमेकींसोबत मतभेद असणारे आहे. कारण घरगुती कामाची अपेक्षा वाढली. निवृत्तीनंतर मिळणारे वेतन हे अर्धे आहे. त्यातही खर्च वाढल्यामुळे घरामध्ये पैसे कमी

दिल्यामुळे संबंधामध्ये फरक पडली. प्रत्येक गोष्टीमध्ये पैशाचा विचार केला जातो. पूर्वी पैशाचा विचार केला जात नव्हता. कुटुंबातील सर्व निर्णय सर्वांच्या सहमतीने घेण्यात येत होते. परंतु सेवानिवृत्ती नंतर कुटुंतामध्ये निर्णय घेतांना विचारणा करण्यात येत नाही. सेवानिवृत्तीनंतर मुलाशी संबंध हे एकमेकांची जाणीव ठेवणारे आहे. सेवानिवृत्तीनंतर कौटुंबिक मतभेदही वाढले. घरामध्ये पूर्ण वेळ दिल्यामुळे बऱ्याच गोष्टी वरून मतभेद होतात. मतभेद हे मुलगा, सून व पतीमध्ये ही होतात. सेवानिवृत्ती नंतर मुलांचे लग्न, घर बांधणे हया कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. कौटुंबिक जबाबदाऱ्या हया पूर्ण न झाल्यामुळे जबाबदारीतून मुक्तता मिळालेली नाही. जबाबदाऱ्या असल्यामुळे सेवानिवृत्तीचा पूर्णपणे आस्वाद घेता येत नाही. सेवानिवृत्ती नंतर निवृत्ती वेतनामध्ये हया कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण होतीलच असे वाटत नाही. कौटुंबिक जबाबदाऱ्या हया पूर्ण न झाल्यामुळे कौटुंबिक जबाबदारी पूर्ण करण्याकडे जास्त कल असतो

सेवानिवृत्ती नंतर कुटुंबामध्ये जास्तीत जास्त वेळ देण्यात येतो त्यामुळे कौटुंबिक मतभेद वाढले. घरातील प्रत्येक बारीक सारीक गोष्टींकडे सेवानिवृत्ती नंतर लक्ष जाते आणि तेच लक्ष मुलगा व सूनेला नको असते. संपर्ण आयुष्य कामात गेले असता. कौटुंबिक जबाबदाऱ्या लवकर संपाव्यात असे वाटते. सेवेमध्ये असतांना कुटुंबाला, मुलांना पुरेसा वेळ देवू शकली नव्हती त्यामुळे आज निवृत्तीनंतर मिळणारा वेळ केवळ कुटुंबासाठी असावा अशी अपेक्षा आहे. सेवानिवृत्ती नंतर कुटुंबामध्ये समायोजन करतांना अडचणी येतात.

सेवानिवृत्तीनंतर वृद्ध स्त्रियांना काम करायची इच्छा नाही. तरी देखील स्त्रियांना कौटुंबिक कामे ही करावी लागतात. सेवानिवृत्ती नंतर मिळालेली रक्कम ही पुर्णतः मुलगा व सुनेला द्यावी अशी अपेक्षा होती परंतु तसे न केल्यामुळे कुटुंबामध्ये गैरसमज निर्माण झालेत. सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांना अंशकालीन नोकरी करण्याची इच्छा आहे.

1) सेवानिवृत्ती नंतर कुटुंबियांच्या वागणुकीमध्ये परिवर्तन झाले.
2) सेवानिवृत्तीनंतर कुटुंबामध्ये मतभेद वाढले.
3) सेवानिवृत्ती नंतर वृद्ध स्त्रियांच्या निर्णयाला कुटुंबामध्ये महत्त्व दिले जात नाही.
4) सेवानिवृत्ती नंतर वृद्ध स्त्रियांचा आपल्या पतीशी सुसंवाद वाढला.
5) सेवानिवृत्ती नंतर मिळणारे निवृत्त वेतन हे अपुरे असल्यामुळे मुलगा व सुनेशी असलेल्या संबंधामध्ये बदल झाला.
6) सेवानिवृत्ती नंतर कौटुंबिक कामे कमी झाली नाहीत उलट वाढली.
7) सेवानिवृत्ती नंतर ही वृद्ध स्त्रियांना कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत.
8) सेवानिवृत्ती नंतर ही कुटुंबातील कामाचे प्रमाण वृद्ध स्त्रियांचे कमी झाले नाही.
9) आर्थिक मिळकती नुसार सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांना कुटुंबामध्ये सन्मान दिला जातो.
10) सेवानिवृत्तीनंतर कुटुंबातील वातावरणा मध्ये फरक पडतो.

**सुचना व शिफारशी :**

1) कुटुंबातील प्रत्येक सदस्यांनी वृद्ध स्त्रियांना सेवानिवृत्ती नंतर देखील कुटुंबामध्ये पूर्वी प्रमाणेच मान सन्मान द्यावा.
2) कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत वृद्ध स्त्रियांचे मत विचारात घ्यावे.
3) नोकरीतील निवृत्ती नंतर कुटुंबातील कामांमधुन ही वृद्ध स्त्रियांना निवृत्ती द्यावी
4) सेवानिवृत्त वृद्ध स्त्रियांकडून निवृत्ती नंतर आर्थिक मिळकतीचा विचार करू नये.
5) कुटुंबामध्ये सेवानिवृत्ती नंतर कौटुंबिक मतभेद ठेवू नयेत.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

6) निवृत्ती नंतर वृद्ध स्त्रियांच्या आवडी निवडीस प्राधान्य देण्यात यावे.

7) कुटुंबामध्ये वृद्ध स्त्रियांच्या अनुभवाचा व त्यांच्या कौशल्याचा योग्य उपयोग करून घ्यावा.

8) सेवानिवृत्ती नंतर वृद्ध स्त्रियांना त्यांच्या इच्छे नुसार अंशकालीन नोकरी किंवा व्यवसाय करण्यास प्रधान्य देण्यात यावे.

9) सेवानिवृत्ती नंतर वृद्ध स्त्रियांशी कुटुंबातील सर्व सदस्यांनी संबंध प्रेमाचे ठेवावेत.

10) सेवानिवृत्तीनंतर वृद्ध स्त्रियांना त्यांच्या मनाप्रमाणे जीवन जगू द्यावे.

11) पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती त्यामुळे वृद्धांच्या समस्या नव्हत्या परंतु आज झालेल्या कुटुंब व्यवस्थेतील बदलामुळे वृद्धांच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत.

**संदर्भ :**

*1) खडसे, डॉ भा. कि.(2004) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस मुंबई*

*2) लोटे, रा.ज. (2015) : भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर*

*3) कोंडेकर, प्रा. ए. वाय (2004) : भारतीय समाजिक समस्या, फडके प्रकाशन, कोल्हापूर*

*4) तुपे, डॉ. नवनाथ (2009) :''बदलते समाज वास्तव आणि ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न'' अंक 7, वर्ष 37, योजना मासिक कार्यालय मुंबई*